**नि.मु.नं. ४१/२०२४**
**निशाणी क्र. ३१.**

**निशाणी क्र. ३१ खालील आदेश**
CNR No.MHLA140000882024

प्रस्तुत अर्ज हा प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांचे प्रस्तुत दाव्याकामी असलेले लेखी म्हणणे दाखल करण्याकामी झालेल्या विलंबाकरीता उशिरमाफी करीता अर्ज केला आहे. वादीतर्फे दिलेले म्हणणे वाचले.

२. प्रतिवादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत दाव्याकामी म्हणणे दाखल करण्याकरीता ते आवश्यक कागदपत्रे शोधत असल्याने वेळेवर जबाबदावा दाखल करता आलेली नाही. प्रतिवादीने जाणुन बुजुन जबाबदावा देणेस उशीर केलेला नाही. त्यामुळे कैफियत दाखल करण्याकामी झालेला विलंब माफ होउन मिळावा अशी विनंती केली.

३. वादीच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र.२ मुदतीत जबाबदावा दाखल करण्यास असमर्थ झाला आहे. प्रतिवादीचा अर्ज मुदतबाह्य आहे. तसेच, सदर अर्जात योग्य कारण नमुद नाही. सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर व्हावा.

४. दोन्ही बाजुंचे म्हणणे पाहिले. दिवाणी प्रकिया संहितेनुसार प्रत्येक दाव्यात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकाराचे म्हणणे दाखल होणे व त्याची योग्य बाजु मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे प्रतिवादी क्र.२ ला त्याची बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश,

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २ यांना कैफियत दाखल करण्याकामी झालेला विलंब माफ करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SABALE SHITAL DATTATRAY
Date: 2025.07.18 16:50:18 +0530

ठिकाण-औसा.
दिनांक : १८/०७/२०२५.

**(एस. डी. साबळे)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, औसा